# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

"उद्योग सारथी", महाकाली गुंफा मार्ग, मरोळ औद्योगिक क्षेत्र, अंधेरी (पुर्व) मुंबई — ४०० ०९३

दुरध्वनी क्र. ०२२-४७४८८३१२ / ४७४८४६९९ /४७४८४६७९ ईमेल :gmhrrecruitment@midcindia.org

मदत केंद्र क्र.: ०२२-४८२५६४३८/३९ संकेतस्थळ - www.midcindia.org

(वेळ सकाळी १०.३० ते सायं ५.३०) शुध्दीपत्रक क्रमांक — ०१/२०२३

---

## सरळसेवा भरती २०२३ जाहिरात शुध्दीपत्रक - १

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील सरळसेवा भरती २०२३ अंतर्गत गट - अ, गट-ब आणि गट-क पदभरतीची जाहिरात क्र. १/२०२३ दि. १४/०८/२०२३ रोजी दैनिक वृत्तपत्रांमध्ये प्रसिध्द झाली आहे. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे शुध्दीपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

१. गट —अ, गट - ब व गट — क मधील नव्याने नियुक्ती होणा-या अधिकारी व कर्मचारी यांच्या संगणक अर्हतेबाबत :- (मुळ जाहिरातीतील अ.क्र. ३१ मधील ३१.५, पृष्ठ क्र. ५९)

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक १९ मार्च, २००३ नुसार ज्या पदांची निवड प्रक्रिया सुरु होईल अशा नव्याने नियुक्त होणा-या सर्व अधिकारी / कर्मचा-यांनी संगणक अर्हता त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत प्राप्त करणे आवश्यक राहिल अन्यथा त्यांच्या सेवा समाप्त होतील, असे नमुद आहे. त्याअन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळातील पदभरतीमध्ये गट - अ, गट - ब व गट - क मधील (पंपचालक (श्रेणी - २), जोडारी (श्रेणी - २), वीजतंत्री (श्रेणी - २) व चालक यंत्र चालक वगळून) सर्व संवर्गातील अर्ज करणा-या उमेदवारांना महाराष्ट्र शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने या संदर्भात वेळोवेळी विहित केलेले संगणक हाताळणीबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत सादर करणे आवश्यक राहिल.

२. लिपिक टंकलेखक पदाकरीता आवश्यक असलेली टंकलेखनाच्या अर्हतेमध्ये सवलत :-

(मुळ जाहिरातीतील अ.क्र. १ मधील अ.क्र. १९ (१९.२) (II), पृष्ठ क्र. १३)

२.१ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, निर्णय क्र. अपंग २०१६/प्र.क्र११६/१६-अ दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ अन्वये लिपिक टंकलेखक या पदावर अर्ज करणा-या दिव्यांग उमेदवारांना जर लिपिक टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाली तर त्यांना टंकलेखनाची (इंग्रजी / मराठी) परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या कालावधीत व २ संधीत सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अवधी व संधी देण्यात येत आहे.

२.२ महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय क्र अनाथ - २०२२/प्र.क्र.८४/का-०३ दि. ०७ जुलै, २०२२ अन्वये लिपिक टंकलेखक या पदावर अर्ज करणा-या अनाथ उमेदवारांना जर लिपिक टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाली तर त्यांना टंकलेखनाची (इंग्रजी /मराठी) परीक्षा

उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या कालावधीत व २ संधीत सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अवधी व संधी देण्यात येत आहे.

२.३ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र संकिर्ण-१११४/प्र.क्र.२००/१६-अ दि.०४ सप्टेंबर, २०१५ अन्वये लिपिक टंकलेखक पदावर अर्ज करणा-या प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त, स्वातंत्र्य सैनिकांचे नामनिर्देशित पाल्य, सन १९९१ चे जनगणना कर्मचारी, सन १९९४ नंतरचे निवडणूक कर्मचारी व पदवीधर / पदविकाधारक अंशकालीन कर्मचारी या सर्व घटकातील उमेदवारांना जर लिपिक टंकलेखक पदावर नियुक्ती मिळाली तर त्यांना टंकलेखनाची (इंग्रजी /मराठी) परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी नियुक्तीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या कालावधीत व २ संधीत सदर परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी अवधी व संधी देण्यात येत आहे.

२.४ महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही २०२३/प्र.क्र.१/कार्यासन १२, दि. १२ जानेवारी, २०२३ अन्वये,

अ. लिपिक टंकलेखक या पदाकरीता अर्ज करणा-या उमेदवारांकडे केवळ मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. वेगमर्यादेचे प्रमाणपत्र असल्यास, त्याने सदर प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल. इंग्रजी ४० श.प्र.मि. टंकलेखन वेगमर्यादेचे विहित प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून ४ वर्षात प्राप्त करणे आवश्यक आहे.

आ. तसेच लिपिक टंकलेखक या पदाकरीता अर्ज करणा-या उमेदवारांकडे केवळ इंग्रजी टंकलेखन किमान ४० श.प्र.मि. वेगमर्यादेचे प्रमाणापत्र असल्यास, त्याने सदर प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल. मराठी ३० श.प्र.मि. टंकलेखन वेगमर्यादेचे विहित प्रमाणपत्र नियुक्तीच्या दिनांकापासून ४ वर्षात प्राप्त करणे आवश्यक आहे.

३. भरती करावयाच्या पदांकरीता उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्रमांक आयडीसी २०२१/प्र.क्र.३२६/उद्योग-१४, दिनांक २२ जून, २०२१ नुसार दिव्यांगासाठीची पदे खालीलप्रमाणे सुनिश्चित करण्यात आलेली आहे. त्याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे. (मुळ जाहिरातीतील अ.क्र. ४ (४.९), पृष्ठ क्र. २९)

| अ. क्र. | पदनाम | कार्यात्मक आवश्यकता | अपंगत्वाच्या प्रकारानुसार पात्रता निकष | |
|---|---|---|---|---|
| १. | कार्यकारी अभियंता (स्थापत्य) | S, ST, W, BN, L, KC, PP, MF, RW, SE, C, | B | D, HH |
| | | | C | OL, Dw, AAV |
| | | | D | ASD (M) |
| | | | E | MD |
| २. | उप अभियंता (स्थापत्य) | S, ST, W, BN, L, KC, PP, MF, RW, SE, C, | B | D, HH |
| | | | C | OL, Dw, AAV |
| | | | D | ASD (M) |
| | | | E | MD |
| ३. | उप अभियंता (विद्युत / यांत्रिकी) | S, ST, W, BN, L, KC, PP, MF, RW, SE, C, | B | D, HH |
| | | | C | OL, Dw, AAV |
| | | | D | ASD (M) |

| अ. क्र. | पदनाम | कार्यात्मक आवश्यकता | अपंगत्वाच्या प्रकारानुसार पात्रता निकष | |
|---|---|---|---|---|
| | | | E | MD |
| ४. | सहयोगी रचनाकार | S, ST, W, CL, MF, RW, SE, C | B | D, HH |
| | | | C | OL, Dw, AAV |
| ५. | उप रचनाकार | S, ST, W, CL, MF, RW, SE, C | B | D, HH |
| | | | C | OA, OL, BL, OAL, Dw, AAV |
| | | | E | MD |
| ६. | उप मुख्य लेखा अधिकारी | S, BN, MF, RW, SE, C | A | B, LV |
| | | | B | D, HH |
| | | | C | OA, OL, BL, OAL, BLOA, BLA, LC, Dw, AAV |
| | | | E | MD involving (A) to (C) above |
| ७. | सहायक अभियंता (स्थापत्य) | S , ST, W, BN, MF, RW, SE, H, C | B | D, HH |
| | | | C | OA, BA, OL, BL, Dw, AAV |
| | | | E | MD |
| ८. | सहायक अभियंता (विद्युत / यांत्रिकी) | S, ST, W, BN, KC, MF, RW, SE, H, C | B | D, HH |
| | | | C | OA, BA, OL, BL, Dw, AAV |
| | | | E | MD |
| ९. | सहायक रचनाकार | S, ST, W, MF, RW, SE, H, C | B | D, HH, |
| | | | C | OA, OL, BL, OAL, Dw, AAV |
| | | | E | MD |
| १०. | सहायक वास्तुशास्त्रज्ञ | S, ST, W, CL, MF, RW, SE, C | B | D, HH, |
| | | | C | OA, OL, BL, OAL, Dw, AAV |
| | | | E | MD |
| ११. | लेखा अधिकारी | S, BN, MF, RW, SE, C | B | D, HH, |
| | | | C | OA, BA, OL, BL, OAL, BLOA, BLA, LC, Dw, AAV, MDy |
| | | | E | MD |
| १२. | क्षेत्र व्यवस्थापक | S, RW, H, MF | A | B, LV |
| | | | B | D, HH |
| | | | C | OA, OL, BL, OAL, BA, BL, CP, LC, Dw, AAV |
| १३. | कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) | S , ST, W, BN, MF, RW, SE, H, C | B | D, HH |
| | | | C | OA, BA, OL, BL, Dw, AAV |
| | | | E | MD |
| १४. | कनिष्ठ अभियंता (विद्युत / यांत्रिकी) | S, ST, W, BN, KC, MF, RW, SE, H, C | B | D, HH |
| | | | C | OA, BA, OL, BL, Dw, AAV |
| | | | E | MD |

| अ. क्र. | पदनाम | कार्यात्मक आवश्यकता | अपंगत्वाच्या प्रकारानुसार पात्रता निकष | |
|---|---|---|---|---|
| १५. | लघुलेखक (उच्च श्रेणी) | S, ST, W, RW, SE, H, C | A | B, LV |
| | | | C | OA, OL, BL, OAL, CP, LC, Dw, AAV |
| | | | D | ASD (M) |
| | | | E | MD |
| १६. | लघुलेखक (निम्न श्रेणी) | S, ST, W, RW, SE, H, C | A | B, LV |
| | | | C | OA, OL, BL, OAL, CP, LC, Dw, AAV |
| | | | D | ASD (M) |
| | | | E | MD |
| १७. | लघुटंकलेखक | S, ST, W, L, MF, RW, SE, H | A | B, LV |
| | | | B | HH |
| | | | C | OA, OL, BL, OAL, CP, LC, Dw, AAV |
| | | | D | ASD (M) |
| | | | E | MD |
| १८. | सहायक | S, ST, W, BN, RW, SE, H, C | A | B, LV |
| | | | B | D, HH |
| | | | C | OA, BA, BL, OL, OAL, CP, LC, Dw, AAV, MDy |
| | | | D | ASD (M, MoD), SLD, MI |
| | | | E | MD involving (A) to (D) above |
| १९. | लिपिक टंकलेखक | S, ST, W, BN, RW, SE, H, C, MF | A | B, LV |
| | | | B | D, HH |
| | | | C | OA, OL, BL, BA, OAL, CP, LC, Dw, AAV, MDy |
| | | | D | ASD (M, MoD), ID, SLD, MI |
| | | | E | MD involving (A) to (D) above |
| २०. | वरिष्ठ लेखापाल | S, ST, W, BN, RW, SE, H, C, MF | B | D, HH |
| | | | C | OA,BA, OL, BL, OAL, CP, LC, Dw, AAV, MDy, |
| | | | D | ASD |
| २१. | तांत्रिक सहायक (श्रेणी-२) | S,ST,W,RW,H,C | B | HH |
| | | | C | OA, OL, BL. |
| २२. | विजतंत्री (श्रेणी-२) | S, ST, W, BN, L, KC, PP, MF, SE | B | D, HH |
| | | | C | OL |
| | | | E | MD |

| अ. क्र. | पदनाम | कार्यात्मक आवश्यकता | अपंगत्वाच्या प्रकारानुसार पात्रता निकष | |
|---|---|---|---|---|
| २३. | पंपचालक (श्रेणी-२) | ST, W, BN, MF, SE | B | D, HH |
| | | | C | OA ,OL, CP, LC, Dw, AAV |
| | | | D | ASD (M, MoD) |
| | | | E | MD |
| २४. | जोडारी (श्रेणी-२) | S, ST, W, BN, RW, SE, H, C | B | D, HH |
| | | | C | OA, OL, OAL, CP, LC, Dw, AAV |
| | | | D | ASD (M), ID |
| | | | E | MD |
| २५. | सहायक आरेखक | S, ST, BN, MF, RW, SE, C, | B | D, HH |
| | | | C | OA, BA, OL, BL, Dw, AAV |
| | | | D | ASD (M), SLD, MI |
| | | | E | MD |
| २६. | अनुरेखक | S, ST, W, BN, L, MF | B | D, HH |
| | | | C | OA, OL, CP, LC, Dw, AAV |
| | | | D | ASD (M), ID, SLD, MI |
| २७. | गाळणी निरीक्षक | S, ST, BN, PP, RW, SE, H | B | D, HH |
| | | | C | OL, CP, LC, Dw, AAV |
| | | | D | ASD (M), |
| | | | E | MD |
| २८. | भूमापक | S, ST, W, MF, RW, SE, H,C | C | OA, OL, LC, Dw, AAV, |
| | | | E | MD |

४. पंपचालक (श्रेणी - २) या पदासाठी आवश्यक असलेली पात्रता व अर्हता खालीलप्रमाणे राहील.
(मुळ जाहिरातीतील अ.क्र. १ मधील अ.क्र. २३.२, पृष्ठ क्र. १६)

२३.२ पात्रता व अर्हता :

I. महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाची शालांत परीक्षा उत्तीर्ण अथवा तत्सम परीक्षा उत्तीर्ण

II. शासकीय वा शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा तारयंत्री या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र

**अथवा**

शासकीय वा शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा पंप ऑपरेटर कम मेकॅनिक या विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र.

५. अनाथ आरक्षण :- अनाथ आरक्षणाकरीता महामंडळाने दि. १४/०८/२०२३ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीमध्ये अ.क्र. ५ मधील ५.३ पृष्ठ क्र. ३१ येथे खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

५.३ महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभागाकडील, शासन निर्णय क्रमांक अनाथ - २०१८/प्र.क्र. १८२/का-०३ दिनांक ०६ सप्टेंबर, २०२२ तसेच दि. ०६ एप्रिल, २०२३, अन्वये अनाथ प्रवर्गासाठी दावा दाखल करणाऱ्या उमेदवाराने कागदपत्रे पडताळणीचे वेळी महिला व बाल विकास विभागाकडील सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. अन्य यंत्रणांमार्फत वितरीत करण्यात आलेली प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

६. पदवीधर अंशकालीन कर्मचारी आरक्षणाकरीता अ.क्र. ९ मधील ९.२ पृष्ठ क्र. ३४ येथे खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

९.२ निवड झालेल्या अंशकालीन कर्मचाऱ्यांची त्यांच्या अनुभवाचे सेवायोजन कार्यालयाकडील मुळ प्रमाणपत्र व तहसिलदार यांचेकडील प्रमाणपत्र कागदपत्रांच्या पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. निवड झालेल्या पदवीधर अंशकालीन उमेदवाराचे मुळ प्रमाणपत्र हे संबंधित प्रमाणपत्र निर्गमित करणाऱ्या अधिकारी यांचे कार्यालयाकडून पडताळणी करुन घेतले जाईल.

७. मागास प्रवर्ग व समांतर आरक्षणाबाबत अ.क्र. २ मधील २.३ पृष्ठ क्र. २६ खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

२.३ प्रस्तुत जाहिरातीमध्ये नमूद संवर्गामध्ये काही मागास प्रवर्ग व समांतर आरक्षणाची पदे उपलब्ध नाहीत. तथापि, जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर तसेच **अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकापर्यंत** जाहिरातीत नमूद नसलेल्या मागासप्रवर्ग तसेच समांतर आरक्षणांकरीता पदे उपलब्ध होण्याची आणि विद्यमान पदसंख्येमध्ये बदल (कमी / वाढ) होण्याची शक्यता आहे. सदर बदललेली पदसंख्या परीक्षेचा निकाल अंतिम करताना विचारात घेतली जाईल. यास्तव परीक्षेच्या जाहिरातीमध्ये पदे आरक्षित नसल्यामुळे अथवा पदसंख्या कमी असल्यामुळे परीक्षेसाठी अर्ज सादर केला नसल्याची व त्यामुळे निवडीची संधी वाया गेल्याबाबतची तक्रार नंतर कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतली जाणार नाही.

८. अग्निशमन विमोचक या पदासाठी सरळसेवा भरती करताना होमगार्ड यांना ५ % आरक्षण ठेवण्याबाबत.
(मुळ जाहिरातीतील अ.क्र. १ मधील अ.क्र. ३४, पृष्ठ क्र. २५)

नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. अशसेके१००६/५६/प्र.क्र.२४/०६/नवि-२४ दि.०५/०२/२००८ नुसार राज्यातील महानगरपालिकांमधील / नगरपरिषद, सिडको व इतर कार्यालयातील अग्निशमन विभागातील फायरमन पदावर नियुक्ती करताना एकूण पदाच्या ५ % पदे होमगार्डस मध्ये कमीत कमी ३ वर्षे इतकी सेवा झालेल्या व फायरमन पदासाठी आवश्यक शैक्षणिक / शारिरीक पात्रता पूर्ण करणा-या व विहीत वयोमर्यादेतील तसेच विहीत पात्रता परीक्षा उत्तीर्ण होणा-या होमगार्डस मधून भरण्यात यावीत असे निर्देश देण्यात आले आहेत.

उक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अग्निशमन विभागाच्या सरळसेवा भरतीमध्ये "अग्निशमन विमोचक" या पदासाठी होमगार्डस जवान यांना ५ % पदे आरक्षित ठेवण्यात यावीत अथवा कसे याबाबत शासनाचे मार्गदर्शन मागविण्यात आले असून अद्याप शासनाचे मार्गदर्शन अप्राप्त आहे. तथापि, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या जाहिरातीमध्ये अग्निशमन विमोचक या पदाबाबत शासनाच्या मार्गदर्शनाच्या अधिन राहून होमगार्ड मध्ये किमान ३ वर्षे इतकी सेवा झालेल्या व अग्निशमन विमोचक पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता व शारीरिक पात्रता पूर्ण करणा-या उमेदवारांना अर्ज सादर करण्यासाठी, आवश्यक विकल्प ऑनलाईन लिंकमध्ये खुला करणेत येत आहे. याबाबतीत शासनाकडून सकारात्मक मार्गदर्शन प्राप्त झाल्यास त्याप्रमाणे होमगार्डसना ५ % समांतर आरक्षण लागू करण्यात येईल. शासनाकडून प्रतिकूल मार्गदर्शन प्राप्त झाल्यास सदर उमेदवारांचा अग्निशमन विमोचक या पदासाठी सर्वसाधारण उमेदवारांमधून विचार करण्यात येईल.

याव्यतिरिक्त दि. १४/०८/२०२३ रोजी प्रसिध्द झालेल्या जाहिरातीमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

स्वाक्षरीत

(तुषार मठकर)
महाव्यवस्थापक (मबवि)
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

स्थळ :- मुंबई
दिनांक :- ३१/०८/२०२३